# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक २५ मार्च, २०२५

## (सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) श्री. संजय उपाध्याय, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहर व उपनगरात शासकीय जमीनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे करुन अनधिकृत बांधकामे व अनाधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम झालेले असणे, सदरच्या अनधिकृत आतिक्रमणे व बांधकामाबाबत अनेक तक्रारी प्राप्त असणे, याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, यामुळे शासकीय जमीनींवर यामध्ये प्रामुख्याने घाटकोपर मानखुर्द लिंक रोड येथील म्हाडा कॉलनीजवळ म्हाडाच्या जागेवर नूर-ए-इलाही या मस्जिदीचे अनधिकृत बांधकाम, मालवणी येथील न्यू कलेक्टर कंपाऊंड गेट क्र.५ मालाड पश्चिम येथील नगर भूमापन क्र.१८४१ वरील अनधिकृत बांधकाम, कोळीवाडा येथील वॉर्ड नं. २२४ ब वॉर्ड मधील अनधिकृत धार्मिक स्थळाचे बांधकाम, वाशी नाका चेंबूर येथे म्हाडाच्या जमीनीवर करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, साईबाबा नगर धारावी येथे करण्यात आलेल्या अनधिकृत धार्मिक स्थळाचे बांधकाम, चेंबूर येथील संगम को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी जागेवर अतिक्रमण करुन करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम यांचा समावेश असणे, यासह १५ पेक्षा अधिक ठिकाणी शासकीय जागांवर अतिक्रमण करुन अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम झालेले असणे, सदर अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम करण्यापूर्वी कायदेशीर बाबींची पूर्तता केलेली नसणे, सदर अतिक्रमणांचे, अनधिकृत बांधकामांचे निष्कासन न झाल्याची स्थानिकांची तक्रार असणे, सदरचे अतिक्रमणाबाबत डोळेझाक व कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्यावर कारवाई व सदर सर्व अतिक्रमणे निष्कासित करून शासकीय जागा शासनाने ताब्यात घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. राजेश वानखडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती जिल्ह्यातील ता.अचलपूर, चांदूर बाजार, भातकुली, अमरावती मधील १०५ गावे वाढीव पाणीपुरवठा योजना जल जीवन मिशन अंतर्गत वर्ष २०२२-२३ मध्ये मंजूर

होणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे करारनाम्यानुसार सदर योजना २०२५, जानेवारी पर्यंत देखभाल दुरुस्ती सह पूर्ण करणे नियोजित असणे, परंतु अद्यापही योजनेची भौतिक प्रगती हे केवळ ५२% व आर्थिक प्रगती ही ६० टक्के एवढीच असणे, कंत्राटदाराकडून मोठ्या प्रमाणात काम पूर्णत्वास नेण्यात दिरंगाई करणे, यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात नाराजी असणे, कामात एवढी दिरंगाई होऊन सुद्धा विभागाद्वारे कंत्राटदारावर अद्यापही कोणतीच दंडात्मक कार्यवाही न करणे, तीन वर्षापासून सुलभ पाणीपुरवठ्याची अपेक्षा करणाऱ्या नागरिकांचा अपेक्षा भंग होणे, एकूणच या परिस्थितीमुळे शासनाप्रती नागरिकांमध्ये निर्माण झालेला रोष, यावर शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.विजयसिंह पंडित, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गेवराई (जि.बीड) तालुक्यातील १९२ गावांसाठी १७२ कोटी रुपये किंमतीच्या १७७ नळ पाणीपुरवठा योजना मंजुर असणे, वॅपकॉस प्रा.लि. या तांत्रिक सेवा पुरवठादार कंपनीचे कंत्राटदारांशी संगनमत असल्यामुळे त्यांचेकडून कामाच्या देखभाल व इतर कर्तव्यात अक्षम्य कसूर होत असणे, जिल्हा परिषद बीडच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून कंत्राटदारांना सातत्याने पाठिशी घालण्याचा प्रयत्न होणे, काम पूर्ण करण्याचा कालावधी १२ ते १८ महिने असतानाही विहित कालावधीत काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द दंडात्मक कारवाई झालेली नसणे, प्रगती कन्स्ट्रक्शन, लातूर यांसारख्या कंत्राटदार कंपन्यांनी बेकायदेशीररित्या योजनांची कामे टक्केवारी घेऊन सबलेट केलेली असणे, जलस्त्रोतांचे काम पूर्ण होण्यापूर्वी नियमबाह्यरित्या कोट्यवधी रुपयांची पाईप खरेदी होणे, गट निविदा करून सुरु केलेली योजनांची कामे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असणे, अनेक योजनांच्या कामा बाबत तक्रारी असतानाही संबंधित विभागाकडून तक्रारींबाबत कोणतीही कारवाई होत नसणे, शासनाचा हजारो कोटी रुपयांचा निधी अक्षरशः वाया जाणे, गेवराई विधानसभा मतदार संघातील जलजीवन मिशन अंतर्गत मंजुर कामाची गुणवत्ते संदर्भात चौकशी होण्याची गरज असणे, जिल्ह्यातील टंचाईग्रस्त नागरीकांना शासनाचे कोट्यवधी रुपये खर्च होऊनही शुध्द पाणी मिळत नसल्यामुळे जनतेत पसरलेला शासन विरोधी असंतोष व संतापाची भावना, त्यामुळे या बाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बीड, जिल्हा रुग्णालयात कोविड काळात कोवीड-१९ साथरोग परिस्थती हाताळण्याठी रेमडीसीवर इंजक्शन वितरण, कंत्राटी कर्मचारी भरती व शासकीय निधीमध्ये मोठ्याप्रमाणात आर्थिक अनियमितता करून भ्रष्टाचार करण्यात आला असणे, याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर व जि.प.बीड. च्या लेखा व वित्त विभागाच्या पथकाने चौकशी करून अनियमितता झाल्याचे स्पष्ट केले असणे, व आरोग्य सेवा, मुंबई यांच्या

पथकाने सदर प्रकरणी चौकशी करून गंभीर आक्षेप नोंदवत संबंधितावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस केली असणे, त्यानुसार शासनाने सध्याचे व तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात व डॉ. सुर्यकांत साबळे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कार्यवाहीसाठी दोषारोप पत्राबाबतची ज्ञापने निर्गमित करण्यात आली असणे, परंतु अद्याप ही संबंधीतावर कार्यवाही करण्यात आलेली नसणे, डॉ. अशोक थोरात यांच्या कार्यकाळात वरील प्रमाणे बीड येथे भ्रष्टाचार करण्यात आलेला असतांना व चौकशी समितीने त्यांना दोषी ठरवले असतांना ही अशा भ्रष्ट अधिकाऱ्यास परत बीड येथे जिल्हाशल्यचिकित्सक पदावर नियुक्ती देण्यात आली असणे, त्यामुळे जनतेतून रोष व्यक्त करण्यात येत असणे, तेव्हा वरील प्रकरणी सध्याचे व तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. थोरात यांच्या सह इतर दोषींवर तातडीने गुन्हे दाखल करून कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयावर सायबर हल्ला झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस येणे, आरटीजीएस व एनईएफटी प्रणालीद्वारे खातेदारांच्या खात्यात रक्कम वळती केली जात असताना सायबर हल्लेखोरांनी संपूर्ण यंत्रणा हॅक करून ३३ ग्राहकांच्या खात्यांतील ३ कोटी ७० लाख ६४ हजार ७४२ रुपये हरियाणा येथील अज्ञात व्यक्तीच्या खात्यात वळती केल्याचे निदर्शनास येणे,चंद्रपूर जिल्हा बँकेच्या मुख्य शाखेचे प्रभारी व्यवस्थापक यांनी रामनगर चंद्रपूर येथील पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल करणे, बँकेतील यंत्रणा तपासली असता ७ आणि १० फेब्रुवारीला विविध सहकारी पतसंस्थांच्या शाखेतील ग्राहकांसोबतच इरतही ग्राहकांचे आरटीजीएस व एनईएफटी व्यवहारांच्या प्रणालीमध्ये गडबड झाल्याचे दिसून येणे, ज्या खात्यांत रक्कम जमा व्हायला हवी होती तिथे रक्कम जमा न होता हरियाणा येथील त्रयस्थ व्यक्तीच्या खात्यात रक्कम जमा झाल्याचे दिसून येणे, अज्ञात व्यक्तीने बँकेची संपूर्ण यंत्रणा हॅक करून हा गैरव्यवहार करणे, या प्रकारामुळे खातेधारकांमध्ये निर्माण झालेले भितीचे व चिंतेचे वातावरण, या प्रकरणी सखोल चौकशी होऊन दोषींवर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री. अतुल भातखळकर, अस्लम शेख, नानाभाऊ पटोले, अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. संजय मेश्राम, सुनिल प्रभू, दौलत दरोडा, योगेश सागर, उमेश यावलकर वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) आणि नो डेव्हलपमेंट झोन (एनडीझेड) जमिनींना विकसित करण्यायोग्य बनवण्यासाठी मालमत्तेच्या नोंदींमध्ये मोठ्या प्रमाणावर

फेरफार केल्याचा जमीन घोटाळा माहे जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये मालाडच्या एरंगळ, मढ आयलंड, वर्सोवा आणि इतर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील ठिकाणांवर सरकारी नोंदी बदलून सुमारे १०२ नकाशे बदलण्यात आले असणे, त्यामध्ये न्यायालयाने या प्रकरणात विशेष पथक स्थापन करून तपास करण्याचे आदेश दिल्याचे निदर्शनास येणे, तसेच हा घोटाळा मुख्यतः दलाल, सरकारी कर्मचारी आणि कंत्राटदारांच्या संगनमताने घडल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरज असणे, तसेच चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(७) श्री. कैलास घाडगे पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"प्रधानमंत्री कुसुम योजनेमध्ये धाराशिवसह राज्यातील अनेक जिल्ह्यात बऱ्याच शेतकऱ्यांचे पंप मिळणे बाकी असणे, व्हेंडर ची १२० दिवसाची मुदत संपूनही शेतकऱ्यांचे पंप बसवलेले नसणे, व्हेंडरकडून मजुरी, सिमेंट तसेच इतर बांधकाम साहित्य आणण्यासाठी वाहतुकीचा खर्च शेतकऱ्यांकडून घेतला जात असल्याच्या तक्रारी लेखी व तोंडी स्वरूपात लोकप्रतिनिधींकडे करण्यात येणे, १२० दिवसात सोलरपंप बसविण्याची मुदत संपल्यानंतर लावण्यात येणारा दंड आठ ते नऊ महिने होऊनही लावण्यात न येणे, मागेल त्याला सौरपंप योजनेत धाराशिव जिल्ह्यात ५८ हजार शेतकऱ्यांनी मागणी करणे त्यापैकी १५ हजार शेतकऱ्यांनी पैसे भरलेले असणे परंतु पडताळणीची यंत्रणा संथगतीने असल्यामुळे पडताळणीसाठी वेळ लागणे, मराठवाड्यामध्ये बोरवेलची संख्या जास्त असून त्या बोरवेलची खोली ५०० ते ७०० फुटापेक्षा जास्त असणे परंतु मागेल त्याला सौरपंप योजनेमध्ये २०० फुटापर्यंतच्या क्षमतेचे पंप वाटप करणे, यामुळे या सौरपंपाचा फायदा होत नसल्याने सौरपंपाची क्षमतेची मर्यादा वाढवण्याची मागणी शेतकऱ्यांनी करणे, प्रत्येक शेतकऱ्याच्या बोरवेलची, विहिरीची खोली वेगवेगळी असल्याने प्रत्येक शेतकऱ्याला त्यांच्या मागणीच्या क्षमतेपर्यंतचे सौरपंप देणे, सध्या ज्या कंपन्या आहेत त्यांच्या व्हेंडरची सेवा निकृष्ट दर्जाची असल्याच्या तक्रारी प्राप्त होणे,शेतकऱ्यांना त्यांच्या बोरवेल, विहिरींच्या खोलीच्या क्षमतेप्रमाणे सौरपंप घेण्यास व सौरपंपाचा लाभ घेता येण्यासाठी MahaDBT मार्फत शेतकऱ्यांना व्हेंडर निवडण्याची सवलत देणेबाबत शासनाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(८) श्री. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"धानोरा १३२ के. व्ही. स्टेशनचे काम मंजूर असून Mesars Bhuvneshwari electrical & Contractor यांना या कामाचा दि.१ एप्रिल २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असणे, त्यानंतरही सदरचे काम सरु करण्यास कंत्राटदार टाळाटाळ करत असणे, सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता (प्रकल्प) अउदा बांधकाम विभाग म.रा. विद्युत

पारेषण कंपनी, मर्यादित, जळगांव व कार्यकारी अभियंता (स्था) अउदा स्था. बां.व.सु. विभाग, जळगांव यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तोंडी व लेखी सूचना देऊनही संबंधितांकडून कारवाईस होत असलेले दुर्लक्ष, उलट संबंधित अधिका-यांकडून कंत्राटदारास पाठीशी घालण्यात येत असणे, कार्यकारी अभियंता (स्था) अउदा स्था. बां.व.सु. विभाग, जळगांव यांनी दि. ३१/१०/२०२३ रोजी चे पत्राव्दारे संबंधित कंत्राटदार यांनी वैयक्तीक अडचणींमुळे हे काम करण्यास असमर्थता दर्शवून काम वेळे आधी बंद करण्याबाबत विनंती केलेली असणे, तसेच सदरचे कंत्राट रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यालय महापारेषण, मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेला असणे, शासनाने उक्त प्रकरणी संबंधित अधिका-यांची व ठेकेदाराची चौकशी करुन दोषी असलेल्यांवर कारवाई करण्याची तसेच धानोरा १३२ के. व्ही. स्टेशनचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यामध्ये सन २०१० ते २०१४ दरम्यान शेतकऱ्यांना केबल टाकून महावितरण आपल्या दारी योजने अंतर्गत वीज पुरवठा करण्यात येणे, केबलद्वारे कनेक्शन घेतल्यामुळे चालू रोहित्रावर लोड आल्यामुळे रोहीत्र जळण्याचे प्रकार सतत घडत असल्याने शेतकऱ्यांची पिक हानी होऊन ऊस जळीत होण्याची शक्यता अधिक वाढलेली असणे, कमी दाबाने वीजपुरवठा वारंवार होऊन केबल जळाल्याने शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होत असणे, केबल चोरी होण्याचे प्रमाण जास्त असणे, त्यामुळे आर्थिक हानी बरोबरच विद्युत अपघाताचे प्रमाण वाढत असणे, तसेच कृषी संजीवनी विज जोडणी धोरण २०२० अंतर्गत वीज बिलातून परतव्यासाठी शेतकऱ्यांना सुरुवातीस पैसे भरावे लागतात तेवढे पैसे भरणे शक्य नसल्याने ते या धोरणात बदल करून मुक्त वीज बिलातील परतवा निशुल्क देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत असणे, शेतकऱ्यांना पोल चारा व ट्रान्सफर उभारून रीत सर्विस जोडण्यात येण्याचा शासन निर्णय १८ जून, २०१९ रोजी शासनाने घेतला असतानाही अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांना अद्याप धोरणाचा लाभ मिळाला नसल्याने त्यांना सदर लाभ देण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री. सिध्दार्थ खरात, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शुक्रवार दिनांक १३ मार्च, २०२५ रोजी बुलढाणा जिल्हयातील शिवणी आरमाळ या गावच्या महाराष्ट्र शासनाचा " युवा शेतकरी पुरस्कार " प्राप्त शेतकरी स्व.कैलास नागरे यांनी भल्या पहाटे विष प्राशन करुन केलेली आत्महत्या,उक्त शेतक-याने आत्महत्या का करीत आहे यांची कारणमीमांसा करीत चार पानांचे पत्र आत्महत्या करण्यापूर्वी लिहून केलेली आत्महत्या, खडकपूर्णा धरणातून शिवनी आरमाळ सह इतर १३ गावांना डाव्या कालव्याच्या

माध्यमातून शेती शिवारासाठी पाणी मिळण्यासाठी लढा सुरु असणे, पाण्यासाठी शेतक-यांना आहुती देणे, गेल्या ७५ वर्षात एका दाण्याचे हजार दाणे करणा-या शेतक-यांचे प्रश्न मात्र काही केल्या सुटता सुटत नसणे, अमरावती विभागामध्ये १,०६९ आणि छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये ९५२ शेतक-यांनी हवामान बदल, ओला व करोडा दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणा या कारणांमुळे केलेल्या आत्महत्या, राज्यात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर, २०२४ या एका वर्षात विदर्भ आणि मराठवाडयातील २,७०६ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्याची कबुली मदत व पुनर्वसन मंत्री महोदयांनी देणे,याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मृत शेतक-यांच्या कुटुंबियाना आर्थिक मदत व त्यांच्या मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने उचलण्याची आवश्यकता,तसेच खडकपूर्णा प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातून शिवणी आरमाळसह लगतच्या १४ गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(११) श्री. शंकर जगताप, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"चिंचवड मतदारसंघातील पूररेषा बाधित क्षेत्रातील इमारतींना अतिरिक्त टी डी आर सहित बांधकाम परवानगी मिळणेबाबत मागील ३० वर्षांपूर्वी चिंचवड, रावेत, वाकड ताथवडे, पुनावळे, सांगवी, पिंपळे गुरव येथील पवना नदी पात्रालगतच्या दाट वस्तीत पूररेषा बाधित क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक व इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यानी बांधकाम व्यवसायिकांच्या मदतीने जुन्या सोसायटीच्या पुर्नविकासासाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र एकात्मिक विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावलीच्या (UDCPR) च्या निर्देशानुसार सादर करणे, ३० जानेवारी २०२३ च्या सुधारित (UDCPR) च्या ११.२.८ अन्वये पाटबंधारे विभागांनी निर्देशित केलेल्या पूर नियंत्रण रेषेतील निळ्या पूररेषेच्या क्षेत्रात विकास हस्तांतरीत हक्क (TDR) वापरण्यास परवानगी नाकारल्याने पूररेषेतील अधिकृत बांधकामांना अतिरिक्त (TDR) वापरण्यास परवानगी दिली जात नसल्याची बाब उघडकीस येणे, मनपाला डेव्हलपमेंट चार्जेसच्या द्वारे प्राप्त होणारा सुमारे १२०० कोटी रुपयांचा महसूल बुडत असल्याने पुर्नविकासासाठी प्रस्तावित सोसायटीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी पूररेषा बाधित क्षेत्रातील इमारतींना अतिरिक्त टी डी आर सहित बांधकाम परवानगी मिळण्याबाबत, चिंचवड मतदारसंघातील निळ्या पूररेषेतील अधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवासी क्षेत्रातील सुमारे ६ लाख ५१ हजार चौरस मीटर क्षेत्राचे पुर्नविकास (REDEVLOPMENT) ला अतिरिक्त (TDR) सहित परवानगी मिळणेबाबत UDCPR नियमावली दुरुस्ती करून अतिरिक्त (TDR) ला मंजूरी देऊन पुर्नविकासाचा मार्ग मोकळा करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

**(१२) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"भंडाऱ्याच्या तहसिलदार विनिता लांजेवार यांनी पदाचा दुरुपयोग व गैरमार्गाचा अवलंब करून मोठया प्रमाणात नियमबाहय कामे केल्याचे आढळून येणे, महाराष्ट्र जमीन महसूल सहिता १९६६ च्या कलम ४२ब, ४२क, ४२ड मधील तरतुदींअन्वये भंडारा तालुक्यातील एन.ए.पी.च्या ३८ प्रकरणामध्ये अकृषिक परवानगीचे अधिकार नसतांना आणि नगरपरिषद भंडारा, सहायक संचालक नगररचना विभाग भंडारा यांची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता तहसिलदार लांजेवार यांनी नियमबाहय अकृषिक परवानगीचे आदेश पारित करणे, तहसिलदार यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५अन्वये अधिकार नसतांना सुध्दा मौजा कारधा, पिंगलाई, पहेला यासह अनेक गावातील अकृषिक जमीनीचे विभाजनाचे नियमबाहय आदेश पारीत करणे, गोपाल व्यास व जया व्यास मौजा खरबी रा.मा.क्र. ०४, ०५, ०६, ०७, ०८,०९, १०, ११, १२, १३, १४ या प्रकरणात एकूण आराजी ९.०५ हे.आर.जमीन ग्रिन झोनमध्ये असतांना तहसिलदार यांनी नियमबाहय अकृषिक वापरासाठी परवानगी देण्यात येणे, या गंभीर प्रकरणाची तक्रार करण्यात आली असता विभागीय आयुक्त, महसूल यांच्या स्तरावरून चौकशी करून अप्पर मुख्य सचिव महसूल यांच्याकडे अहवाल सादर करणे, या अहवालात सुध्दा तहसिलदार यांनी नियमबाहय काम केल्याचे स्पष्ट नमुद करण्यात येणे, या भ्रष्टाचारी तहसिलदाराला दोन वेळा निलंबित करण्यात आले असतांना सुध्दा त्या भंडारा येथेच कार्यरत असणे, त्यांच्या कारकिर्दित मोठया प्रमाणात अवैध धंदे सुरू असल्यामुळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोषाचे वातावरण, त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१३) श्री. साजिद पठाण, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पाथरी, जि. परभणी येथील सर्व्हीस रोडवरील बेकायदेशीर प्लॉट अतिक्रमण काढून सर्व्हीस रोड कायम करण्यात यावा व मोकळया जागेत बेकायदेशीररित्या बांधलेले व्यापारी संकुल अतिक्रमण काढावे किंवा शासनाची मालकी जाहीर करुन बेरोजगार तरुणांना व्यापार करण्यासाठी सदरील व्यापारी संकुल उपलब्ध करुन देणेबाबत उपविभागीय अधिकारी, पाथरी यांनी जिल्हाधिकारी परभणी यांना अहवाल सादर केला असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, असे असूनही यासंदर्भात संबधित जिल्हाधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही केली नसणे, यामुळेच बेरोजगार तरुणांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची व निराशेची भावना लक्षात घेता उक्त प्रलंबित प्रकरणी शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया."

(१४) **श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे लोहा, ता.लोहा, जि.नांदेड येथील सर्व्हे ११३ मधील जमीन क्षेत्र ३.१७ हे.आर जमीनीचा शासनाने शासकीय कार्यालयासाठी भूसंपादन करण्याकरिता जमीन मालकांकडून केलेला अपूर्ण व्यवहार, हा पूर्ण न केल्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होऊ न शकणे, मात्र काही रक्कम शासनाने जमीन मालकास दिल्यामुळे त्याबदल्यात काही जमीन संपादित करुन उर्वरित जमीन मूळ मालकास परत करण्याचा शासनाचा प्रस्ताव असतांना शासनाच्या दिरंगाईमुळे मूळ मालकाने सदर जमीन परस्पर इतरांना विक्री केल्याचा घडलेला प्रकार, असे असतांना शासनाने कायदेशीररित्या जमीन संपादित न करताच त्या ठिकाणी करोडो रुपयांची शासकीय कार्यालये अनधिकृतपणे बांधून कार्यालय सुरु करणे, परिणामी अनधिकृतपणे जमीन ताब्यात घेऊन केलेले चुकीचे बांधकाम आणि त्यामुळे मूळ मालकांना कोणताही मोबदला न मिळाल्यामुळे मूळ मालकाने मा.न्यायालयात जमिनीचा मोबदला मिळणेबाबत शासनाच्या संबंधित विभागाविरुध्द दाखल केलेला दावा, या अनुषंगाने न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे मूळ मालकांस देय असलेली रक्कम खुपच असल्यामुळे जमीन संपादित न करतां शासनाने भूभाडे देण्याबाबत वाटाघाटी करुन घेतलेला निर्णय, यामुळे शासनाचे करोडो रुपयांचे झालेले नुकसान, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन शासकीय नियमाप्रमाणे भूसंपादन न करतां जमीन मालकांच्या परवानगीविना कोटयवधी रुपयांच्या इमारती बांधून शासनाची करण्यांत आलेली फसवणूक विचारांत घेता याप्रकरणी शासन नियम डावलून ज्या अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर वर्तन केले आहे त्यांच्यावर तात्काळ करावयाची कार्यवाही व मूळ मालकास योग्य न्याय देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१५) **सर्वश्री. संजय पुराम, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, राजकुमार बडोले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गोंदिया जिल्हा हा अतिदुर्गम, आदिवासीबहूल आणि नक्षलप्रभावित असून या जिल्ह्यात शेतकऱ्यांना सिंचनासाठी व जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी ज्वलंत समस्या निर्माण झाली असणे, दरवर्षी पाटबंधारे विभागाकडून सर्वेक्षण करुन शेतकऱ्यांना सिंचनासाठी चक्राकार पद्धतीने पाणी सोडले जात असणे, परंतु मोजक्या शेतकऱ्यांनाच पाणी मिळत असणे, त्यामुळे दरवर्षी जिल्हा प्रशासनाला यासाठी मोठी कसरत करावी लागत असणे, गोंदिया जिल्ह्यातील आमगांव विधानसभा क्षेत्रातील अतिसंवेदनशील तालुक्यांमध्ये कुवाढास प्रकल्प, तावागड, काशिनाला, गेडाम, नकट्या प्रकल्प असे २५ ते ५० एकरात असलेल्या सिंचन प्रकल्पाची कामे निधीअभावी प्रलंबित असणे, या प्रकल्पांची कामे प्रलंबित असल्यामुळे पाणी साठविण्यासाठी अडचण निर्माण होणे, या क्षेत्रातील पुजारीटोला, कालीसराड, शिरपूरबांध, कोठीटोला धरण, बेवारटोला प्रकल्पांची दुरुस्तीची कामे विस्कळीत

होणे, सालेकसा तालुक्यातील १३ गावांची सिंचनक्षमता असलेल्या मानगड मध्यम प्रकल्पाला अंदाजे ५० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असून या प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी २४.४८ कोटीचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी असणे, याच तालुक्यातील ५० हेक्टर सिंचनक्षमता असलेल्या पिपरीया लघू प्रकल्पास ४८ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असून या प्रकल्पाची विशेष दुरुस्ती करणे आवश्यक असणे, या प्रकल्पांच्या कामांना तातडीने मंजूरी दिल्यास शेतकरी सुजलाम, सुफलाम होईल आणि दरवर्षी शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी जिल्हा प्रशासनाला कसरत करावी लागणार नाही, यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**(१६) श्री. रामदास मसराम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"छत्रपती संभाजीनगर येथील लक्ष्मण तुकाराम कनले यांनी अवैधरित्या अनु. जमाती मधील “मन्नेरवारलू” जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करून आजपावेतो २८ वर्ष नोकरी करीत असणे, याच व्यक्तीच्या रक्त नात्यातील यांची पुतणी शिवानी तात्याराव कनले यांच्या जातवैधता प्रकरणात खुल्या प्रवर्गातील “मराठा” जात असलेले लक्ष्मण कनले यांनी शासनाची व न्यायालयाची फसवणूक केल्याची बाब औरंगाबाद जात पडताळणी समिती पुढे आल्याने तत्कालीन सहआयुक्त यांनी दि. ०६/१०/२०२० रोजी लक्ष्मण कनले यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असणे, सहआयुक्त संगीता चव्हाण यांनी दक्षता पथकाच्या गृह चौकशीत लक्ष्मण कनले यांच्या “मराठा” या मुळ जातीचे पुरावे समितीच्या रेकार्डवर असतांनाही दुर्लक्ष करून दि. ०१/०२/२०२३ रोजी चुकीच्या पद्धतीने लक्ष्मण कनले यांची नोटीस रद्द करून अक्षम्य चूक केलेली असणे, याचाच फायदा घेऊन ३८ लोक “मन्नेरवारलु” जातवैधता आधारे नोकरीत अनु. जमातीच्या आरक्षणाचा लाभ घेत असणे, त्यामुळे संगीता चव्हाण यांनी सहआयुक्त पदाचा गैरवापरामुळे मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद, सिविल अप्लिकेशन ४७४८/२०२३, रिट याचिका ३२२४/२०२३, दि. ०६/०४/२०२३ रोजीच्या निर्णयात संगीता चव्हाण यांना दंड ठोठावण्याबाबत आदेश निर्गमित केले असणे, पण यावर अजूनही कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे बोगस जात वैधता प्रमाणपत्र देणे थांबविण्यासाठी व सहआयुक्त यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१७) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कळस ते बारी ता.अकोला, जि.अहिल्यानगर SS५० हा रस्ता २०१७-१८ साली मंजूर असणे, सदर रस्त्याच्या कामासाठी अंदाजित १४३ कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले असणे, तसेच रस्ता आतापर्यंत पूर्णत्वास गेलेला नसून रस्त्याच्या कडेच्या झाडांची वृक्षतोड करुन त्या ऐवजी नवीन झाडे लावणे कायद्याने बंधनकारक असतांनाही झाडे लावलेली नसणे, सदर रस्त्याचे काम पुढे चालू असून मागील रस्त्याचे काम उखडत असल्याचे

फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, परिणामी स्थानिक जनतेमध्ये तीव्र असंतोष पसरुन शासनाप्रती रोष निर्माण होणे, त्याबाबत शासनाने संबंधित कंत्राटदार यांच्याविरुध्द चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, तसेच सदरच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका."

**(१८) श्री. उमेश यावलकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजा लोणी व राजुरा बाजार, ता.वरुड, जि.अमरावती या भागात माहे नोव्हेंबर, डिसेंबर २०२३ या कालावधीत अतिवृष्टी व माहे एप्रिल, २०२४ ला गारपीट होणे, अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना मदत शासन निर्णय क्रमांक-सीएलएस २०२३ प्र.क्र.२८६(११) म-३ ३१ जानेवारी २०२४ नुसार निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली असणे, तसेच गारपीट व अवेळी पावसामुळे शेती पिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना मदत शासन निर्णय क्रमांक-सीएलएस २०२३ प्र.क्र.२८६ (११) म-३ दिनांक २ ऑगस्ट २०२४ नुसार निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली असणे, त्याप्रमाणे शेतक-यांनी KYC सुद्धा केलेली असणे, परंतु आता उर्वरित शेतक-यांना अनुदानाचे वाटप थांबविण्यात आलेले असणे, वरूड तालुक्यातील शेतकरी संत्रा व मोर्सची फळपिकांचे २ हंगामामध्ये पीक घेत असून अवेळी पाऊस व गारपीटमुळे संत्रा व मोर्सची उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानाला समोर जावे लागणे, संत्रा मोसंबी फळपिकांचे दोन हंगाम लक्षात घेता संत्रा व मोसंबी उत्पादक शेतक-यांना अतिवृष्टी व गारपीट चे अनुदान तात्काळ वाटप करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१९) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील गोडया पाण्यातील मच्छिमार सहकारी संस्थांनकरिता संस्था नोंदणी व तलाव ठेक्याच्या सुधारित शासन निर्णय दि.३/०७/२०१९ रोजी निर्गमित करणे, सदरचा शासन निर्णय राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थांच्या हिताच्या असणे, तथापि त्यामध्ये बदल करुन मत्स्य व्यवसायासंबंधीबाबत दि. १२/५/२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यांत येणे, तथापि सदर शासन निर्णयावरती दि.२६/५/२०२३ रोजीच्या निर्णयान्वये स्थगिती उठविण्यात येणे, परंतु दि.१२/५/२०२३ रोजीचा सदर शासन निर्णय हे सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थेच्या हिताचे नसणे, त्यामुळे सर्व भूजलाशयातील मत्स्य संस्थेवर फार मोठया अडचणी निर्माण होणे, सदर शासन निर्णयामुळे अस्तित्वात असलेल्या संस्थेवर उपासमारीची वेळ येणे, त्यामुळे दि.१२/५/२०२३ रोजीच्या शासन निर्णयावर दि.२६/५/२०२३ ला स्थगिती देण्यात आलेली असून सदर शासन निर्णयावरील स्थगिती कायम करण्यांत यावी अशी गोंदिया मच्छिमार सहकारी संस्थांची मागणी असणे, परिणामी, दिनांक १२/५/२०२३ रोजीचा शासन निर्णय कायमस्वरुपी रद्द करण्याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२०) श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मिरारोड रेल्वे स्टेशनच्या पश्चिम दिशेला असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या ५०० एकर खार जमिनीवर मे मिरा रिअल इस्टेट डेव्हलपर्स यांनी कब्जा केल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, या कंपनीने मीठ उत्पादनाकरिता दि. १/१०/१९७८ ते ३१/१०/१९८३ पर्यंत परवाना क्र. ४८ अन्वये परवानगी घेणे, याविरुद्ध मीठ विभागाने हरकत घेणे, याबाबत कंपनीने मीठ विभागाविरुद्ध मा.उच्च न्यायालय यांच्याकडे अपील दाखल केले असता त्यांच्या बाजूने निकाल लागणे, या निकालाविरुद्ध मीठ विभागातर्फे मा. सर्वोच्च न्यायालयात दाद मागितले असता सदरचे प्रकरण जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे दाखल करणे कामी निर्देश देणे सदर निर्देशानुसार जिल्हाधिकारी यांनी सदर कंपनीविरुद्ध निकाल देऊन सदर जमीन महाराष्ट्र शासनाच्या नावे करण्यात येणे, याविरुद्ध अपर आयुक्त कोकण यांच्याकडे दावा दाखल केला असता त्यांनी जमीन महाराष्ट्र शासनाच्या असताना देखील कोणतीही शहानिशा न करता सदर कंपनीचे नावे करणे, यामुळे कंपनीकडून अभिलेखात नाव लावणे कामी प्रयत्न करण्यात येणे यावर पुन्हा मीठ उपायुक्त यांच्यातर्फे हरकत घेण्यात येणे सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही जमीन शासनाची असताना कोणत्याही दाव्यात शासनाची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न न करणे,यामध्ये शासनाच्या काही अधिकाऱ्यांनी न्यायव्यवस्थेच्या डोळ्यात धुळफेक करून आपल्या अधिकाराचा गैरवापर केलेला असणे अशा विविध प्रकारामुळे शहरातील जनतेमध्ये प्रशासनाच्या बाबतीत निर्माण झालेला संभ्रम आणि यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(२१) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे येथील सिंहगड किल्ल्यावर दररोज हजारो पर्यटक, इतिहासप्रेमी आणि अभ्यासक भेट देत असणे, गडावर असलेल्या ऐतिहासिक वास्तू, बुरुज, प्रवेशद्वार आणि तटबंदी ढासळत असूनही पुरातत्व विभागाने पूर्ण क्षमतेने कोणतीही तात्काळ दुरुस्ती किंवा संवर्धनाची कार्यवाही केलेली नसणे, कल्याण दरवाजाची दुरवस्था, वाढते अतिक्रमण, पुणे दरवाजाची दुरवस्था, पुरातत्व विभाग, वन विभाग, MTDC अधिकाऱ्यांचा अनागोंदी कारभार आणि जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष यामुळे गडाचे ऐतिहासिक महत्त्व धोक्यात आले असणे, स्वच्छता आणि पायाभूत सुविधा अत्यंत अपुऱ्या असून, पर्यावरण संवर्धन, सुरक्षा याकडे दुर्लक्ष केले जात असणे, सिंहगडाच्या सर्वसमावेशक विकासासाठी आवश्यक निधी मंजूर न करता गडाच्या पर्यटन वाढीकडे दुर्लक्ष केले जात असणे, पिण्याच्या पाण्याची प्रस्तावित पाणी योजना रखडलेली असणे, शौचालयाची दुरवस्था, पार्किंगसाठी सोय, अधिकृत गाईड सेवा, मुख्य प्रवेशद्वाराजवळ वळणावरील खिंडीतला धोकादायक रस्ता, संरक्षण भिंत याबाबत जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी व संबंधित प्रशासकीय बैठकीत सिंहगड किल्ल्याच्या विकासासंदर्भात झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी अद्याप

झालेली नसणे, पुरातत्व विभाग, वन विभाग आणि पर्यटन विभाग यांचा समन्वय नसल्यामुळे सिंहगडाच्या विकासासंदर्भातील योजना फक्त कागदावर राहिल्या असणे, सिंहगड किल्ल्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी स्वतंत्र निधी मंजूर करून पर्यटन, पुरातत्व आणि वन विभाग यांच्या संयुक्त समन्वयाने ठोस कृती आराखडा तयार करून तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(**सकाळी ११.०० वाजता**)

**एक** : **प्रश्नोत्तरे**

**(अ) तारांकित प्रश्न**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**खनिकर्म मंत्री** : "चंद्रपूर जिल्ह्यात कोळसा खाणीत होणाऱ्या अतिउत्खननामुळे शेतीचे नुकसान होऊन खाणपट्टयातील जलस्त्रोतांनाही धोका निर्माण झाल्याबाबत" या विषयावरील श्री.बंटी भांगडिया, वि.स.स. यांचा दिनांक ११ मार्च, २०२५ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक २६९० च्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उद्योग मंत्री** : महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचा अनुक्रमे एकोणचाळीसावा व चाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **सांस्कृतिक कार्य मंत्री** : कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर यांचे सन २०१२-२०१३ ते सन २०१५-२०१६ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **कृषी मंत्री** : डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा पंचावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(४) **परिवहन मंत्री** : "कोकण व पश्चिम महाराष्ट्रास जोडणाऱ्या चिपळूण-कराड रेल्वे मार्गाकरीता राज्याच्या अर्थसंकल्पामधून निधीची तरतूद होण्याची आवश्यकता" या विषयावरील श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांच्या दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी म.वि.स. नियम १०५ अन्वये उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(५) **सहकार मंत्री** : "यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत मोठ्या प्रमाणात झालेली अनियमितता" या विषयावरील श्री.नानाभाऊ पटोले व इतर वि.स.स. यांच्या दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी म.वि.स. नियम १०५ अन्वये उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : (सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुरेश भोळे, सुधीर मुनगंटीवार, चेतन तुपे, सुरेश धस, दिपक केसरकर, अनिल पाटील, प्रशांत बंब, डॉ.तानाजी सावंत, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री नारायण कुचे, रमेश बोरनारे, राजकुमार बडोले, देवराव भोंगळे, राजेश क्षिरसागर, प्रताप पाटील-चिखलीकर, अभिमन्यू पवार, विजय शिवतारे, धर्मराव आत्राम, प्रकाश भारसाकळे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, चैनसुख संचेती, मंगेश कुडाळकर, दिलीप बनकर, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रकाश सुर्वे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रवीण दटके, किशोर पाटील, नरेंद्र भोंडेकर, मोहन मते, दौलत दरोडा, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री राजू तोडसाम, प्रकाश सोळंके, संजय गायकवाड, राजेश वानखडे, संतोष बांगर, संजय बनसोडे, किसन वानखेडे, दिलीप लांडे, सत्यजित देशमुख, विनोद अग्रवाल, चंद्रकांत सोनवणे, दिलीप वळसे-पाटील, संभाजी निलंगेकर-पाटील, संतोष दानवे, राजेश पवार, शिवाजी कर्डिले, सचिन कल्याण-शेट्टी, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, रत्नाकर गुट्टे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री प्रताप अडसड, राणाजगजितसिंह पाटील, बबनराव लोणीकर, तान्हाजी मुटकुळे, किसन कथोरे, सर्वश्रीमती मोनिका राजळे, सीमाताई हिरे, देवयानी फरांदे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, संजय केळकर, हरिश पिंपळे, उमेश यावलकर, सुमित वानखेडे, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, सर्वश्रीमती सई डहाके, स्नेहा दुबे, सुलभा गायकवाड, सर्वश्री योगेश सागर, भिमराव तापकीर, श्रीमती मनिषा चौधरी,**

**सर्वश्री अतुल भातखळकर, शंकर जगताप, कृष्णा खोपडे, विक्रम पाचपुते, करण देवतळे, गोपीचंद पडळकर, अमल महाडिक, राहुल आवाडे, महेश लांडगे, चरणसिंग ठाकूर, अमोल जावळे, दिलीप बोरसे, डॉ. राहुल आहेर, ॲड. राहुल ढिकले, श्री. सुभाष देशमुख, डॉ. सुरेश खाडे, डॉ. अतुल भोसले, ॲड. राहुल कुल, सर्वश्री काशिराम पावरा, समीर मेघे, समीर कुणावार, विजय रहांगडाले, किर्तीकुमार भांगडिया, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री विनोद अग्रवाल, संजय पुराम, किशोर जोरगेवार, राजेश बकाने, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री श्याम खोडे, केवलराम काळे, भीमराव केराम, जितेश अंतापुरकर, सिध्दार्थ शिरोळे, अनुपभैय्या अग्रवाल, राजेश पाडवी, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री शिवाजी पाटील, संजय उपाध्याय, चंद्रकांत पाटील, सुनिल शेळके, निलेश राणे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री शरद सोनवणे, किरण सामंत, आशुतोष काळे, हिरामण खोसकर, राजेश विटेकर, राजू कारेमोरे, शेखर निकम, सचिन पाटील, संग्राम जगताप, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"शेतकरी सुखी, तर राज्य सुखी" हा मंत्र व शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेऊन राज्यातील बळीराजाला स्थैर्य देणे, त्याला बळकट करणे आणि शेतीला नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे हे ध्येय समोर ठेऊन आणि नारी शक्ती व युवा शक्तीला प्राधान्य देऊन राज्यात विविध योजना गतीमानतेने कार्यान्वित करण्याचा, जन कल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये देण्यात येत असणे, केवळ १ रुपयात पिक विमा देण्यात येत असून त्यायोगे महाकृषी विकास अभियान राबविण्यात येत असणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली तसेच ई-फेरफार, संगणकीय सातबारा उतारे यासारख्या योजना राबऊन पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असणे, शेतकऱ्यांचा आर्थिक आधार बळकट करण्यासाठी "मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)" प्रकल्प कार्यान्वित केला असणे, शेतमालाला बाजारपेठ मिळऊन देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्य साखळी विकसित करण्यात आली असणे, "मागेल त्याला शेततळे" या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने त्यात फळबागा, ठिंबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर यांचा समावेश करण्यात आला असणे, शेतक-यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, POCRA टप्पा-२ तसेच, जलयुक्त शिवार टप्पा-२ यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे प्रयोजन असणे, मविआकडून शेतक-यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई म्हणून केवळ ८,७०१ कोटी निधी वितरित करण्यात आला असताना विद्यमान शासनाच्या काळात हाच निधी १६,३०९ कोटी वितरित केला असणे, राज्यातील शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरिता राज्यातील सर्व सब स्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याचे प्रयोजन असणे, याद्वारे निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी अपेक्षित असणे, राज्यात जगातील सर्वात मोठा ९ हजार मेगावॅट क्षमता असलेला डिस्ट्रब्युटेड रिन्युएबल

एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे ५० टक्के कृषी फिडर्स सौरऊर्जेवर चालविणे शक्य होणार असणे, विद्यमान शासनाने शेतक-यांना सिंचनासाठी "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना" जाहिर केली असणे, या शासनाने "मागेल त्याला सौरकृषी पंप योजना" सुरु केली असल्याने शेतक-यांना केवळ १० टक्के रक्कम भरुन सौर पॅनल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा प्राप्त होणे, दलित आणि आदिवासी शेतकऱ्यांना तर ही रक्कम केवळ ५ टक्के भरावी लागणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, या शासनाच्या काळात २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असणे, परिणामी विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षांतून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य झाले असणे, राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे इ. योजना एकत्रितपणे राबविल्याने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहिर केलेल्या भारतातील जलाशयांच्या गणनेत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला असल्याचे निदर्शनास येणे, हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठी एक आदर्श व पथदर्शी झाले असणे, कर्जबाजारी शेतक-यांना आधार देऊन कर्जमुक्त करण्यासाठी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना" सुरु करण्यात आली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरीता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, तूर हे जिरायती शेतक-यांचे पिक असून ते नैसर्गिक आपत्तीत तग धरणारे, कमी खर्चाचे व आंतरपिक पध्दतीने घेता येणारे असल्याने त्याची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, कापूस लागवड ते वेचनी यातील बहुतांश कामे मंजुरांऐवजी यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून करणे आवश्यक असून हमी भावाने कापूस खरेदीसाठी सीसीआयने उघडलेल्या केंद्राची संख्या वाढविण्याची आवश्यकता, किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने २.२२ लाख मे.टन व एनसीसीएफ अंतर्गत ०.३५ लाख मे. टन कांदा खरेदी केला असणे, हमीभावाने कापूस खरेदीसाठी सी.सी.आयने राज्यात १२१ खरेदी केंद्रे मंजूर केली असणे, कापूस प्रक्रिया उद्योगातील सर्व घटकांना काही सवलती देण्याची आवश्यकता, कापूस, सूत, कापड निर्यातीच्या संधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आला असणे, कापूस आधारित पिक पध्दतीस चालना देणे, कापूस पिकात एकात्मिक किड व्यवस्थापनास चालना देणे, अधिक लांब धाग्याच्या कापसांच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादकास चालना देण्याचे या शासनाचे धोरण असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीन साठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय या शासनाने घेतल्याने त्याचा ६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणे, 'नारीशक्ती दुत अॅप' हे क्रांतिकारी अॅप्लीकेशन शासनाने सुरु केल्याने ते गरजू महिलांना ओळखण्यासाठी व सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरत असणे, राज्यातील युवकांना स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून उभे राहता यावे याकरिता युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, युवकांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाची,

निवासाची कुठेही अडचण येऊ नये या उद्देशाने राज्यातील ६ महसूल विभागात १०० युवक-युवतींसाठी युवा वसतीगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघूर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात शेतकरी कर्जमुक्त व सधन होऊन शेतकरी, शेतमजुर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी, पर्यटनाला चालना मिळण्यासाठी व लोक कल्याणकारी आणि गतीमान राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : (सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, संजय केळकर, दिपक केसरकर, प्रकाश सोळंके, राम कदम, विजय शिवतारे, दौलत दरोडा, रविंद्र चव्हाण, रमेश बोरनारे, अनिल पाटील, अमित साटम, मंगेश कुडाळकर, चेतन तुपे, योगेश सागर, प्रकाश सुर्वे, संग्राम जगताप, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री राजेंद्र गावित, दिलीप बनकर, ॲड. पराग अळवणी, डॉ.बालाजी किणीकर, श्रीमती सुलभा खोडके, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री अशोक पाटील, राजकुमार बडोले, मिहिर कोटेचा, शांताराम मोरे, राजू कारेमोरे, पराग शाह, दिलीप लांडे, चंद्रकांत नवघरे, कालिदास कोळंबकर, महेंद्र थोरवे, संजय बनसोडे, श्रीमती विद्या ठाकूर, श्री. महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रवीण दटके, तुकाराम काते, सुनिल शेळके, मोहन मते, निलेश राणे, किसन कथोरे, राजेश क्षिरसागर, डॉ.किरण लहामटे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री मुरजी पटेल, आशुतोष काळे, संजय उपाध्याय, विश्वनाथ भोईर, शेखर निकम, सर्वश्रीमती सना मलिक, देवयानी फरांदे, सर्वश्री किरण सामंत, विलास तरे, मंगेश चव्हाण, राजेश मोरे, हिरामण खोसकर, कुमार आयलानी, राजेश विटेकर, राजेश पवार, विनोद अग्रवाल, रत्नाकर गुट्टे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, हेमंत रासने, भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, रणधीर सावरकर, सुधीर मुनगंटीवार, समीर कुणावार, सुरेश भोळे, शिवाजी कर्डिले, देवराव भोंगळे, राजन नाईक, श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री महेश लांडगे, नरेंद्र मेहता, श्रीमती सुलभा गायकवाड, श्री. प्रशांत ठाकूर, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, हरिश पिंपळे, प्रताप अडसड, डॉ.संजय कुटे, डॉ. मिलिंद नरोटे,**

**सर्वश्री सुमित वानखेडे, अभिमन्यू पवार, श्रीमती सीमाताई हिरे, श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"हे राज्य लोकांचे आहे आणि लोकांसाठी आहे" ही भावना मनामध्ये ठेऊन महायुतीचे शासन वेगाने कार्यरत असणे, मुंबई-पुणे व एमएमआरडीएसह राज्यातील अन्य छोटया शहरांमध्ये स्टार्टअप्सची संख्या वाढत असल्याने इंडिया स्टार्टअप्सनी घोषित केलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र हे स्टार्टअप्सचे देशातील पहिल्या क्रमाकांचे राज्य ठरले असणे, महायुती शासनाने महाराष्ट्रात अशक्य वाटणारा समृध्दी महामार्ग कार्यान्वित केला असणे, या महामार्गामुळे मुंबई-पुण्यात होणारी गुंतवणूक धुळे, गडचिरोली, नागपूर, अमरावती या भागात वाढत असल्याचे निदर्शनास येणे, नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती मार्गाचे बांधकाम हाती घेण्याचा निर्णय घेतला असणे, या द्रुतगती मार्गामुळे, त्या मार्गावरील प्रमुख धार्मिक क्षेत्रे व तिर्थस्थळे जोडण्याचे प्रयोजन असून या प्रदेशातील आर्थिक विकासाला देखील चालना मिळू शकेल, राज्याच्या शहरी भागात पायाभुत सुविधांद्वारे शहरी जीवनमान सुधारण्यासाठी 'नगरोत्थान महाभियान' प्रभावीपणे राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत पाणी पुरवठा, मलः निस्सारण व विकास यांचे सुरु असलेले प्रकल्प दोन वर्षात पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असणे, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने या शहरामध्ये गृहनिर्माण व गतीमान परिवहन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन स्मार्ट सिटीच्या माध्यमातून स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाचा प्रयत्न असणे, मेट्रो-२ ए आणि २ बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर च्या मध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुखकर झाल्याचे दिसून येणे, ठाणे-बोरीवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे, मुंबई-पुणे मिसिंग लिंक या ६७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूची निर्मिती, शिवडी ते न्हावाशेवा या मुंबई पोरबंदर प्रकल्पाची निर्मिती जलदगतीने सुरु असणे, मुंबईतील कुर्ला येथील नेहरूनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुर्नविकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाली नसल्याचे निदर्शनास येणे, या गृहनिर्माण वसाहतींसाठी लागू केलेल्या अभय योजनेची मुदत वाढविण्याची आवश्यकता, कुर्ला येथील रेल्वे हद्दीतील संतोषी माता नगर, साबळे नगर व क्रांतीनगर येथे अनेक वर्षे राहणा-या झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनामार्फत पर्यायी जागा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता, नेहरूनगर येथील म्हाडाच्या वसाहतीत राहणा-या पोलीस कर्मचा-यांना माफक दरात निवासस्थाने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, राज्यभरात ४०९ नागरी समुहांमध्ये 'प्रधानमंत्री आवास योजना' (शहरी)' राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत २ लाखांपेक्षा अधिक घरे बांधण्यात आली असून, १ लाख ८५ हजारांपेक्षा अधिक घरांचे बांधकाम प्रगतीपथावर असणे, मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण झाल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था तातडीने दूर करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था व वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुर्नविकास करण्याची आवश्यकता,

पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभुत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरिटेज टिडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मुंबईतील जुन्या इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाकरिता मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणा-या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असल्याने गृहनिर्माण प्रकल्प वेगाने उभे रहात असल्याचे निदर्शनास येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टॅम्प डयुटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरु करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसन मधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यात ५१ लाख घरे बांधण्याचे प्रस्तावित असणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासातील १५०० हेक्टर भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, समुह विकास पध्दतीने हा प्रकल्प राबविण्याचे प्रयोजन असणे, वाशी येथील सध्याच्या दोन खाडी पुलांना समांतर अशा तिस-या सहा पदरी खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, नवी मुंबई विमानतळामुळे वाढणा-या लोकसंख्येसाठी नियोजित 'नैना' प्राधिकरणामार्फत २३ गावांच्या नियोजित आराखड्याच्या अंमलबजावणीस गती देण्याची आवश्यकता, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यासारख्या मोठ्या शहरांचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक पटलावरचे हे महानगर त्याच उच्च दर्जाचे व्हावे व येथील प्रत्येक कुटुंबात सुख आणि समाधान नांदावे ही या शासनाची महत्वाकांक्षा असणे, मुंबई व एमएमआरडीए क्षेत्रातील घरांची समस्या, वाहतुक समस्या इ. चे गतीमानतेने निर्मूलन करून मुंबईचा पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी.

**सहा : (सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री योगेश सागर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, प्रवीण दटके, अब्दुल सत्तार, प्रकाश सोळंके, सुधीर मुनगंटीवार, डॉ.तानाजी सावंत, सर्वश्री दौलत दरोडा, रणधीर सावरकर, दिपक केसरकर, अनिल पाटील, रविंद्र चव्हाण, विजय शिवतारे, चेतन तुपे, मोहन मते, कृष्णा खोपडे, रमेश बोरनारे, संग्राम जगताप, समीर मेघे, मंगेश कुडाळकर, दिलीप बनकर, अमित साटम, प्रकाश सुर्वे, राजकुमार बडोले, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, राजू कारेमोरे, चैनसुख संचेती, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, समीर कुणावार, प्रदीप जैस्वाल, संजय बनसोडे, विनोद अग्रवाल, संजय गायकवाड, श्रीमती सरोज अहिरे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री चंद्रकांत सोनवणे, सुनिल शेळके, सुमित वानखेडे, चंद्रदिप नरके, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री अभिमन्यू पवार, राजेश क्षिरसागर, आशुतोष काळे, सचिन कल्याण-शेट्टी, महेश शिंदे, शेखर निकम,**

**सुरेश धस, सुहास कांदे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री हरिश पिंपळे, महेंद्र दळवी, हिरामण खोसकर, प्रकाश भारसाकळे, दिलीप लांडे, राजेश विटेकर, विजय रहांगडाले, निलेश राणे, अतुल भातखळकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री देवराव भोंगळे, आमश्या पाडवी, अण्णा बनसोडे, डॉ. मिलिंद नरोटे, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री राजेंद्र गावित, किशोर जोरगेवार, अमोल पाटील, किर्तीकुमार भांगडिया, हिकमत उढाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री अमोल खताळ, संजय केळकर, संतोष दानवे, विठ्ठल लंघे, प्रशांत बंब, चरणसिंग ठाकूर, सर्वश्रीमती रंजनाताई जाधव, देवयानी फरांदे, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, सुहास बाबर, नारायण कुचे, किरण सांमत, राजेश पवार, विलास भुमरे, संभाजी निलंगेकर-पाटील, शरद सोनवणे, डॉ.अतुल भोसले, सर्वश्री राजेंद्र यड्रावकर-पाटील, सुभाष देशमुख, डॉ.अशोकराव माने, सर्वश्री राजेश मोरे, शिवाजी पाटील, आनंद तिडके, किशोर पाटील, संजय पुराम, मुरजी पटेल, महेंद्र थोरवे, किसन वानखेडे, तान्हाजी मुटकुळे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री अशोक पाटील, विलास तरे, बबनराव लोणीकर, शिवाजी कर्डिले, देवेंद्र कोठे, सत्यजित देशमुख, रत्नाकर गुट्टे, सुरेश भोळे, राजेश बकाने, करण देवतळे, प्रताप अडसड, राजू तोडसाम, श्याम खोडे, श्रीमती सई डहाके, प्रविण तायडे, केवलराम काळे, उमेश यावलकर, राजेश वानखडे, गोपीचंद पडळकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"नागपूर कराराचे उद्दीष्ट डोळयासमोर ठेऊन नागपूरसह विदर्भाच्या विकासाला चालना देण्याकरीता विद्यमान शासन कटीबध्द असणे, नागपूर जवळील मिहानमध्ये सेझ अंतर्गत पायाभूत सुविधा निर्माण झाल्याने बोईंगच्या एमआरओसह अनेक उद्योगांनी नागपूरात येण्यास स्वारस्य दाखविल्याचे निदर्शनास येणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमानतळाचे अद्ययावतीकरण आणि विस्तारीकरण हा नागपूरच्या विकासाचा मैलाचा दगड ठरणार असणे, विस्तारित विमानतळाच्या माध्यमातून ९,००,००० टन क्षमतेच्या कार्गोची हाताळणी होणार असणे, परिणामी, नागपूर विमानतळ मध्य भारतातील गेम चेंजर म्हणून सिध्द होणार असणे, नवीन विमानतळ ३,००,००० स्वे. फूट क्षेत्रात बांधले जाणार असल्याने व सध्याच्या धावपट्टीच्या शेजारी आणखी ६० मीटर रुंद आणि ४ हजार मीटर लांबीची धावपट्टी बांधण्यात येणार असल्याने तेथे एकाच वेळी १०० विमाने उभी राहण्याचे प्रयोजन असणे, मोठया औद्योगिक टाऊनशिपला लागून असलेले कार्गो हब आणि मोठे विमानतळ ही रचना विदर्भातील भविष्याच्या विकासाचे द्योतक ठरणार असणे, विमानतळाच्या विस्तारामुळे तेथून होणाऱ्या माल वाहतुकीची क्षमता वाढल्याने विदर्भातील सर्व उत्पादनांची निर्यात होण्यास गती मिळणार असणे व त्यामुळे सुमारे १ लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार असणे, रस्ते, रेल्वे, विमानतळ विकास यामुळे विदर्भ लॉजिस्टीक हब म्हणून विकसित होणार असणे, जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये ६३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सुमारे १५ लाख ७२ हजार कोटी रुपये इतक्या गुंतवणूकीच्या सामंजस्य करारावर स्वाक्ष-या झाल्याने महाराष्ट्र हे थेट परकीय गुंतवणूकीसाठी पसंतीचे राज्य असल्याचे स्पष्ट झाले असणे, देशातील एकूण थेट परकीय गुंतवणूकीच्या २९ टक्के गुंतवणूक राज्यात आली असणे, परिणामी, राज्यात १५ लाखांपेक्षा

अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, राज्य शासन आणि बजाज फिनसर्व्ह यांच्यात सुमारे ५ हजार कोटी रुपये गुंतवणूकीचा सामंजस्य करार करण्यात आल्याने ४० हजार रोजगारांची निर्मिती होणे अपेक्षित असणे, मुंबई महानगर विकास प्राधिकरणातील विकास केंद्राबाबत कॅलिफोर्नियातील बर्कले युनिर्व्हसिटी समवेत सामंजस्य करार करण्यात येणे, सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्याबाबतीत महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य ठरले असणे, राज्यात मुंबई, पुणे व छत्रपती संभाजी नगर येथे जी-२० च्या विविध बैठका यशस्वीरित्या आयोजित करण्यात आल्या असणे, औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्यातील विविध उद्योगांना सुमारे ६ हजार कोटी रुपये इतके गुंतवणूक प्रोत्साहन अनुदान वितरित करण्यात येणार असणे, राज्यातील औद्योगिकीकरणाला पाठबळ व प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुमारे ३,५०० एकर इतके औद्योगिक भूखंड वितरित करण्याचा निर्णय घेण्यात येणे, पुरवठा साखळीची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि जागतिक दर्जाची व्यवसाय परिसंस्था निर्माण करण्यासाठी १० एकात्मिक औद्योगिक केंद्रे व एकात्मिक माल वाहतूक केंद्रे विकसित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असणे, सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये बेरोजगार युवकांना उद्योगांशी जोडण्यासाठी व रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी राज्यात जिल्हा स्तरावर ६११ 'पंडीत दीनदयाल रोजगार मेळावे' आयोजित केले असणे, त्यायोगे १९ हजारांपेक्षा अधिक उमेदवारांना नोकऱ्या प्राप्त झाल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील जनतेचे आरोग्य सुदृढ ठेऊन प्रत्येक नागरिकाला 'आरोग्यम् सुखसंपदा' उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने 'महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना' व 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' या एकत्रित योजनांतर्गत लाखो रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या असणे, राज्यात ३० वर्षांवरील सर्व महिलांचे कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान, नाक, घसा व इतर आजारांचे निदान व उपचार याकरीता राज्य शासनातर्फे प्रती जिल्हा २ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असणे, राज्यात शुन्य ते अठरा वर्षांपर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागरुक पालक, सुदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबविण्यात येणे, राज्यात ग्रामीण तसेच दुर्गम भागांमध्ये राहणा-या नागरिकांना प्रत्येक छोट्या आजारासाठी हॉस्पीटलमध्ये जावे लागू नये याकरिता 'हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या योजनेंतर्गत महाराष्ट्रात ७०० दवाखाने सुरु करण्यात येणे, राज्यात विविध महापालिका व जिल्हा परिषदेतील औषधे, वैद्यकीय उपकरणे खरेदीतील अनियमिततेला पायबंद घालण्यासाठी "महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण" स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यातील रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इ. पायाभूत सुविधा विकास क्षेत्रांसाठी निधी उभारणे आणि प्रकल्प राबविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली 'महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ' स्थापन करण्यात येणे, सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील कामे या महामंडळामार्फत करण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नागपूर येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिर्व्हसिटीची इमारत, नागपूर जिल्हा न्यायालयाची विस्तारित इमारत, मुंबईतील माझगाव न्यायालयाची इमारत, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाची इमारत, जलभूषण बंगला, राजभवन इ. इमारतींचे बांधकाम अलीकडेच पूर्ण करण्यात येणे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व

योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (PMIS) ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याचे सहापदरी रुंदीकरण करण्यासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, नाबार्ड-२८ अंतर्गत १,०३०.५२ कोटी रुपयांच्या ३८२ कामांना नाबार्ड कडून मंजुरी प्राप्त झाली असणे व राज्य शासनाने देखील त्यास प्रशासकीय मान्यता दिली असणे, सर्व समाज घटकांना सोबत घेऊन, सर्वसमावेशक, प्रगतिशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**(सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री जयंत पाटील, आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री भास्कर जाधव, नाना पटोले, रोहित पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, उत्तमराव जानकर, अजय चौधरी, अमित देशमुख, संदिप क्षिरसागर, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री नारायण पाटील, सुनिल राऊत, अमित झनक, अभिजीत पाटील, संजय पोतनीस, विकास ठाकरे, राजू खरे, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री हारुन खान, साजिद खान पठाण, महेश सावंत, हेमंत ओगले, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, महिलांवरील अत्याचार व बलात्कारांच्या घटनेत दिवसेंदिवस होत असलेली वाढ, नातेवाईकांकडून लहान मुली व महिलांवर करण्यात येत असलेला अत्याचार व बलात्काराच्या घटना, शाळेत शिकणाऱ्या लहान बालिकासुद्धा सुरक्षित नसणे, राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर येथे सातत्याने खून, मारामाऱ्या व मोठ्या प्रमाणात दंगली होत असल्याने कायदा व सुव्यवस्थांचे धिंडवडे निघणे, अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात तस्करी व तरुणांकडून याचे सेवन यांस होत नसलेला प्रतिबंध, पुण्यातील स्वारगेट एस.टी. स्थानकात शिवशाही बस मध्ये एका तरुणीवर करण्यात आलेला बलात्कार, मुक्ताईनगर येथे एका केंद्रीय मंत्र्यांच्या मुलीची छेड काढण्यात आल्यामुळे नागरिकांत पसरलेला असंतोष, हत्या, दरोड्यांचे व ऑनर किलिंगचे वाढलेले प्रमाण, राज्यात पोलिस दलाचे राजकीयकरण झालेले असून मोठ्या गुन्हेगारी टोळ्यांना राजकीय अभय मिळत असल्याने कायदा व सुव्यवस्था ढासळलेली असणे, बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या करण्यात आलेल्या भीषण हत्येतील मुख्य सुत्रधाराला पकडण्यात पोलिसांना आलेले

अपयश, या हत्याकांडातील आरोपींना पोलिसांकडून देण्यात येत असलेले अभय, राज्यात बरेच ठिकाणी मागासवर्गीय व्यक्तींवर होत असलेले अत्याचार, संविधानाचा अवमान झाल्याप्रकरणी परभणी येथे शांततेने आंदोलन करीत असताना पोलिसांनी लाठीचार्ज करत श्री. सोमनाथ सुर्यवंशी यांना पोलिस ठाण्यात नेऊन केलेल्या प्रचंड मारहाणीमुळे पोलिस कोठडीत त्यांचा झालेला दुर्देवी मृत्यू, अद्यापही संबंधित दोषी पोलिसांविरुद्ध न झालेल्या कारवाईमुळे मागासवर्गीय समाजात पसरलेला तीव्र असंतोष, बीड जिल्ह्यातील परळी शहरात महादेव मुंडे या व्यावसायिकाची झालेली निर्घुण हत्या, अद्यापही त्यांच्या मारेकऱ्यांना पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, मुंबईत गेल्या अकरा महिन्यात जबरी चोरी, घरफोडी व दरोड्याच्या ४८,३४३ घटना घडणे, याच कालावधीत १०१ लोकांच्या करण्यात आलेल्या हत्या, अशा प्रकारच्या गुन्हेगारी घटना अद्यापही थांबलेल्या नसणे, पोलिसांचा गुंडांवर वचक राहिलेला नसणे, बुलढाणा जिल्ह्यातील कैलास नांगरे या राज्यशासनाच्या युवा पुरस्कार प्राप्त युवकाने शेतीला पाणी मिळावे यासाठी केलेली आत्महत्या, राज्यातील वाढलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या व त्यांना मिळत असलेली तुटपुंजी मदत, राज्यातील एकंदरीतच रखडलेले सिंचनाचे प्रकल्प, शेतमालाचे पडलेले भाव व त्यास जबाबदार असलेले केंद्र व राज्य शासनाचे धोरण, यामुळे शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान, इंटरनॅशनल टूरिझम फेस्टीवल प्रा. लि. या कंपनीने केंद्र सरकारच्या "दादासाहेब फाळके इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल" या ट्रेडमार्कचा गैरवापर करुन व शासनाचा कार्यक्रम असल्याचे भासऊन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणे, बीड जिल्ह्यातील केळगाव येथील आश्रम शाळेत शिक्षक श्री. धनंजय नागरगोजे अठरा वर्षापासून काम करत असणे, परंतु वेतन न मिळाल्यामुळे त्यांनी केलेली आत्महत्या, शासनाने सन २०२३ साली कायम विनाअनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान मंजूर केलेले असणे, परंतु अद्यापही त्याची अंमलबजावणी न झाल्याने अशा शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर आलेली उपासमारीची वेळ, दिव्यांग शाळांना व दिव्यांगांच्या कायम विनाअनुदानित शाळांना जुलै, २०२४ मध्ये अनुदान देण्याची केलेली घोषणा, परंतु संबंधित आयुक्तांकडून त्याबाबतची होत असलेली चुकीची अंमलबजावणी, राज्यात शासकीय शाळा बंद पडण्याचे वाढलेले प्रमाण, ज्या शाळा सध्या सुरु आहेत त्या शाळेत संगणक, ग्रंथालय व क्रीडांगण त्याचप्रमाणे स्वच्छतागृहांची सोय नसणे, यात सुधारणा न केल्यास राज्यातील शासकीय मराठी शाळा हळूहळू बंद पडण्याची भीती व्यक्त करण्यात येत असणे, अशा परिस्थितीत गरीब पालकांच्या पाल्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागणे, यासाठी शासनाने यात तातडीने लक्ष घालून राज्यातील शासकीय शाळा सुरु ठेवण्याची व शाळांची संख्या वाढण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, ठाणे येथील रतनशी प्रेमजी चॅरिटेबल ट्रस्टने बेकायदेशीररित्या ट्रस्टच्या जमिनी विकणे, ट्रस्टच्या जागेचा वापर फक्त शैक्षणिक कारणास्तव करता येईल अशी तरतूद असणे परंतु या जमिनी विकासकांना विकून करण्यात आलेला भ्रष्टाचार, विकलेल्या काही जमिनी वन विभागाच्या सुद्धा असणे, या ट्रस्ट मध्ये मोठ्या प्रमाणात गैरकारभार सुरु असणे, ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा, दिवा, कळवा तसेच कल्याण, डोंबिवली येथे मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने ही कामे झाल्याचा आरोप येथील नागरिकांनी करणे, या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची होत असलेली मागणी, राज्यात वाळू माफीयांकडून शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर

करण्यात येत असलेले हल्ले यात बरेच अधिकारी व कर्मचारी गंभीर जखमी होणे, वाळू उपश्यावर बंधने असताना सुद्धा रात्री नदीतून प्रचंड प्रमाणात बेकायदा वाळू उपसा होत असून यावर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, नवी मुंबई येथील टोरेस ज्वेलर्स या कंपनीने अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून राज्यातील नागरिकांचे करोडो रुपये बुडऊन केलेले पलायन, अद्यापही नागरिकांचे पैसे परत केलेले नसणे, शासनाने यात लक्ष घालून गरीब नागरिकांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत उपाययोजना करण्याची होत असलेली मागणी, राज्यात ऑक्टोबर २०२४ पर्यंत सायबर गुन्ह्यांच्या सुमारे २ लाख ४१ हजार तक्रारी नोंदविल्या गेल्या असणे, यामध्ये सर्वसामान्य जनतेचे कोट्यावधी रुपये बुडाले असल्याने कष्टाने कमविलेले पैसे जाण्याची भिती निर्माण होणे, शासनाच्या विविध विभागात वाढलेला भ्रष्टाचार, त्यास असलेला राजकीय वरदहस्त, मुंबई व ठाणे महानगरपालिकेतील विविध विकास कामात झालेले गैरव्यवहार, त्यांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, शासनाच्या विविध महामंडळात नियमबाह्यरित्या केलेल्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, यामुळे पात्र अधिकाऱ्यांवर होत असलेला अन्याय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लांबणीवर पडल्याने वाढलेला मनमानी कारभार, बुलढाणा जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे वितरीत करण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या गव्हामुळे १८ गावातील लोकांच्या आरोग्यावर झालेला विपरित परिणाम, शासनाची परवानगी न घेता १३५० बसेस एस.टी महामंडळाने भाडेतत्वावर घेण्याचा घेतलेला निर्णय, त्यामुळे शासनाचे जवळपास दोन हजार कोटींचे नुकसान होण्याची शक्यता, यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, राज्यातील पोलिस यंत्रणेवर वाढत असलेले हल्ले त्यामुळे पोलिसांचे खचलेले मनोबल, पत्रकारांवर दाखल होत असलेले खोटे गुन्हे, त्यामुळे पत्रकारांचे ढासळलेले मनोबल, शासनातील जबाबदार व्यक्तींकडून होत असलेली बेताल वक्तव्ये, ज्यामुळे सामाजिक सलोखा बिघडत चाललेला असणे, महापुरूषांबाबत अपमानजनक वक्तव्ये करण्याची वाढलेली वृत्ती आणि त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मुंबई, ठाणे, पुणे इत्यादि महानगर क्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून दरवर्षी आकारण्यात येणारा अकृषि कर (N.A.Tax) रद्द करण्याची घोषणा शासनातर्फे ऑक्टोबर-नोव्हेंबर,२०२४ दरम्यान करण्यात येणे, परंतु अदयापही याबाबतचा शासन निर्णय काढण्यात न येणे, त्यातच महसूल विभागातर्फे सोसायट्यांना अकृषि कर (N.A.Tax) भरण्याबाबत काढलेल्या नोटीसा, त्यामुळे सहकारी संस्थामध्ये राहणाऱ्या सभासदांमध्ये पसरलेला असंतोष, मुंबईतील मालाड (पूर्व) दिंडोशी येथील नागरी निवारा प्रकल्पाची जमीन वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतरीत करताना १० टक्के ऐवजी १ टक्के शुल्क रक्कम आकारण्याची आवश्यकता, अकृषि कर (N.A.Tax) रद्द करण्याबाबत शासन निर्णय त्वरित काढण्याची आवश्यकता, वांद्रे (पूर्व) मतदार संघातील रेल्वेच्या अखत्यारीतील जागेची पुनर्मोजणी करण्याचा प्रस्ताव मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने महसूल विभागाकडे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास सादर करणे, पूर्वी केलेल्या मोजणीमध्ये राज्य शासनाची जागा रेल्वेची दाखविण्यात येणे, पुनर्मोजणीचा प्रस्ताव त्वरेने मंजूर करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेने दिनांक ८ जुलै, २०२५ पासून शहरातील सर्व बेकरी व रेस्टॉरंटमधील कोळश्यावर चालणाऱ्या तंदूर भट्टया कायमस्वरुपी बंद करण्याची व हरित ऊर्जेवर व्यवसाय सुरु ठेवण्याची अट टाकण्यात येणे,

या अटीमुळे लहान व्यावसायिकांवर आर्थिक ताण येणार असल्यामुळे त्यांच्यात पसरलेले चिंतेचे वातावरण, अनेक कामगार बेकार होण्याची शक्यता, सदर निर्बंध मागे घेण्याची व्यावसायिकांनी केलेली मागणी, राज्यातील महागाई, बेरोजगारी यासारख्या मूलभूत प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, विविध महापुरुषांची स्मारके उभारण्याबाबत शासनाने केलेल्या घोषणा परंतु त्याची न झालेली अंमलबजावणी, राज्यात गुंतवणूक करण्यास इच्छूक असलेल्या उद्योजकांना स्थानिक गुंडांद्वारे होत असलेला त्रास, ज्यामुळे उद्योजकांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कारवाई व करावयाची उपाययोजना."

**आठ : भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त "भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल" या विषयावर चर्चा (पहिला दिवस).**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा